सदैव तत्पर सदैव मदतनीस
दूरध्वनी क्र. ०२२-२५६८४२२८

महाराष्ट्र शासन
पोलीस विभाग
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ७ यांचे कार्यालय मुंबई
पुरुषोत्तम खेराज बिल्डींग, पहिला मजला,
नेताजी सुभाषचंद्र रोड, मुलुंड (प), मुंबई - ४०० ०८०
E-mail:- zone7daily@gmail.com

# प्रेसनोट

दिनांक ०४/०८/२०२५ रोजी परिमंडळ ०७ मधील घाटकोपर, पंतनगर, विक्रोळी, पार्कसाईट, भांडुप, कांजुरमार्ग, मुलूंड व नवघर या सर्व ०८ पोलीस ठाण्यांकडुन हस्तगत करण्यात आलेला गुन्ह्यातील मुद्देमाल व गहाळ मुद्देमाल परत करण्याकरीता सामुहिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

मा. श्री देवेन भारती , पोलीस आयुक्त , बृहन्मुंबई, मा. श्री सत्य नारायण चौधरी ,पोलीस सह -आयुक्त (कायदा व सुव्यवस्था), डॉ. श्री महेश पाटील अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग मुंबई, मा. श्री राकेश ओला, पोलीस उप आयुक्त परिमंडळ ०७ यांचे मार्गदर्शनाखाली परिमंडळ ०७ मधील नमुद ०८ पोलीस ठाण्याकडुन चेन स्नॅचिंग, जबरी चोरी, घरफोडी चोरी, वाहन चोरी, मोबाईल चोरी तसेच इतर चोरी इत्यादी मालमत्ता विषयी गुन्हयामधील मौल्यवान दागिने, मोटार वाहन , टॅब व रोख रक्कम, तसेच चोरी व गहाळ झालेले एकुण ३५९ मोबाईल यांचा मानवी कौशल्य व तांत्रीक तपास करून एकुण १,५२,७९,६७५/- (एक करोड बावन्न लाख एकोणतऐंशी हजार सहाशे पंच्याहात्तर रुपये ) किंमतीची मौल्यवान दागिने, मोटारवाहन व मोबाईल अशी मालमत्ता हस्तगत करण्यात आली होती.

दिनांक ०४/०८/२०२५ रोजी मुलुंड कॉलेज ऑफ कॉमर्स, मुलुंड पश्चिम मुंबई ८० येथे डॉ. श्री महेश पाटील, अपर पोलीस आयुक्त पुर्व प्रादेशिक विभाग मुंबई, मा. श्री राकेश ओला, पोलीस उप आयुक्त परिमंडळ ०७ मुंबई यांचे हस्ते वरील किंमतीचे मौल्यवान दागिने, मोबाईल, व इतर मालमत्ता संबंधीत तक्रारदारांना परत करण्यात आली. सदर कार्यक्रमास एकुण ३९५ नागरिक उपस्थित होते त्यामध्ये मोठ्या प्रमाणात महिला व जेष्ठ नागरिक यांचा समावेश होता.

सदर कार्यक्रमामध्ये गुन्हयातील मालमत्ता/ गहाळ मालमत्ता पोलीसांकडुन परत मिळाल्याने नागरिकांनी आनंद व्यक्त करून पोलीसांचे आभार मानले.